# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक ११ | मुंबई | मे, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**

*संपादकीय*

## भांडा सौख्यभरे?

—सुहासिनी कीर्तिकर

आधी कधी याबद्दल लिहीलेय की नाही; आठवत नाही. पण आम्हाला हिंदी 'प्रवीण' परीक्षेला (म्हणजे चौथ्या परीक्षेला) काही एकांकिका (एकांकी) होत्या अभ्यासायला. त्यात एक होती 'रीढ की हड्डी' अन् आणखी अशाच अनेक. त्यातीलच एक प्रसंग. एक घोडागाडी भर रस्त्यात उभी. टांगेवाला आणि गिऱ्हाईक यांचे तावातावाने भांडण चालू. भवती हीऽऽ गर्दी. गर्दी अर्थातच गिऱ्हाईकाच्या बाजुनं. गिऱ्हाईक एक आधुनिक, तरतरीत तरुण. त्याच्या हातात स्मार्ट बॅग. पैशानंबैशानं बऽऽरा असावा असा त्याचा पोशाख. टांगेवाला भाड्यावरून भांडत होता. त्याचं म्हणणं होतं की घोड्याला चारा घालावा लागतो, घरी बायकोमुलं आहेत, हल्ली तबेलेही नाहीत फारसे, महागाई 'मीऽऽ' म्हणतेय. मुख्य म्हणजे तो तरुण गाडीत चढण्यापूर्वीच भाडे ठरलेले होते. मग आता भाड्याविषयी ही खळखळ का? गरीबाच्या पोटावर पाय का? त्याचं बोलणं तरीही अजिजीचंच होतं. खरं तर त्याची बाजू बरोबर होती. त्या तरुणाचीच चूक. पण तो शिरजोरी करत होता. ''माजलेयत हे टांगेवाले. पूर्वी साहेबलोकांना माना खाली घालून नेतच होते नं भाड्यानं? मग मी देतोय ते पैसे घ्यायला काय होतं? चांगली 'दस की नोट' देतोय..'' वगैरे वगैरे. भांडण तर दोघांमधलंच. क्षुद्र बाबीवरून चाललेलं. पण लोकांना काय हो? 'बिनपैशाचा तमाशा' पहायला मिळतोय; तर रहा कोंडाळं करून. अन् गर्दीला आकारच नसतो. अमिबा असतो ना; सतत हालचाल करून आकार बदलत रहाणारा. तशी ही गर्दी. असं भांडण चांगलं पंधरा मिनिटं चालूच. गर्दी वाढतेय. अन् अचानक तो तरुण हसायला लागला. टांगेवाल्याला थोपटत म्हणाला, ''जाऊ दे याऽऽर. हे घे पंचवीस रुपये. वीसच ठरले होते ना? घे. वर आपणहून देतोय.'' एवढं बोलून तो टांग्यातच उभा राहून गर्दीला सामोरा गेला. आपल्या बॅगेतून त्याने काही वस्तू बाहेर काढल्या अन् लागला की सेल्समनगिरी करायला. म्हणजे? अहो, ते भांडण त्यानं मुद्दामच उकरून काढलं होतं; गर्दी जमवायला. हा त्या एकांकिकेचा हास्यकारक, धक्कातंत्र असलेला शेवट होता. हे वेगळेच नाट्यपूर्ण भांडण होतं; नाही का?

असंच एका बालकथेत दाखवलेलं भांडणही लक्षात राहिलेलं आहे. शेजारच्या वाड्यात रहात होती एक गावभर गाजलेली भांडकुदळ बाई. कालांतराने तिच्या मुलाचं लग्न झालं. नवीन सून घरात आली. शेजारीपाजारी म्हणू लागले, ''आता सुनेचं काऽऽही खरं नाही. सासूबाई भांड भांड भांडणार. छळ छळ छळणार'' पण नव्या नवलाईचे दिवस ओसरले तरी त्या शेजारच्या वाड्यातून सुनेचा 'ब्र' ही ऐकू आला नाही. सदान्कदा आपला सासूचाच तोफखाना चालू. पण सून शांतच. छ्या! याला काय अर्थ? भांडण रंगायला तोंडोतोंडी, शब्दाशब्दी हवीच. मग शेजारीपाजारी आडून आडून चौकशी करू लागले. 'आऽऽजी, तुमची सून खरोखरच शांत स्वभावाची हो'', ''काय काकू; सुनेशी एवढं भांडता पण ती शब्दही बोलत नाही हो! भाग्यवान आहात.'' आज्जीबाई चवताळल्या. म्हणाल्या, 'कसली शांत? भांडकुदळ आहे नुसती. मला गुंडाळून ठेवल्येय.'' हे लोकांना कसं पटणार सांगा? एकदा काय झालं की आजीबाईचा सुनेवर तोफमारा सुरू झाला. शिव्यांची लखोली, तिच्या माहेरच्यांचा उद्धार, तिला विशेषणं... पण नेहमीप्रमाणेच सुनेची 'फ्रन्ट' शांत. सामसूम. शेजारीण हळूच आजीच्या वाड्यात शिरली चोरपावलांनी. पहाते तर काय?... कडाकडा बोटं मोडून तावातावाने सासू बोलतेय अन् सूनबाई? तिच्या समोरच उभी आहे. हातात केरसुणी उगारलेली. जीभ वेडावून दाखविणारी सूनबाई सासूबाईंनी तिला एखादं विशेषण बहाल केलं की तोच झाडू सासूच्या दिशेनं करीत जणू सांगत होती की 'तू कैदाशीण', 'तू आगलावी', 'तू भांडखोर', 'तू लाजबुडवी'.... तेही झाडूच्या नुसत्या खुणेने. न बोलता. हे मूकनाट्य शेजारणीला फारच प्रभावी वाटलं. वाटलं की भली खोड मोडली या भांडकुदळ बाईची सुनेनं. मूकनाट्य प्रभावी करणारं असं हे भांडण.

जेथे गर्दी, खेचाखेच, स्पर्धा, खटपटी तेथे भांडणे ठरलेलीच. रोजच्या गाडीच्या प्रवासात तर रोजच असे 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असतात. चढण्याउतरण्यावरून, बसण्याच्या जागेवरून, उगाचच कायदेकानून दाखवून, खोकण्या-थुंकण्यावरून, लागलेल्या किंवा मारलेल्या धक्क्यावरून... काही वेळा अशावेळी 'ही गाडी काय तुझ्या बापाची आहे?' असा बाप काढून राष्ट्रीय संपत्तीची लोकमालकी दाखवली जाते! त्या मानानं शाळकरी वयातली भांडणं 'कट्टीबट्टी'ची लज्जत वाढवणारी. कॉलेजमधील 'प्रेमाची' भांडणं (?) तर अनेकांना 'गॉसिप मॅटर' पुरवणारी. कचेरीत, संस्थांत होणारी भांडणं बऱ्याच वेळा 'कागदी घोडे' नाचवणारी. घरातील भांडणं 'चहाच्या पेल्यातील वादळ' ठरणारी. कधी कधी अबोला. रुसवा यामुळे आवाजरहितच. विद्याधर पुंडलिकांची आजोबा आजीचं असंच भांडण रंगवणारी कथा आठवतेय? आजोबा आजीशी भांड भांड भांडतात. डोक्यावर पाण्याची बादली उपडी करून अगदी 'तिच्या नावाने आंघोळ' करतात; अन् तरातरा घर सोडून निघून जातात. नातवाला हे भांडण म्हणजे घर मोडणारच वाटतं. पण आजी? अगदी शांत. काही झालंच नाही; अशा थाटात स्वयंपाक करते. आश्चर्य वाटते नातवाला की आजोबांच्या आवडीचं असं श्रीखंडही करते. पूर्ण दिवस सरतो. आजी जेवत मात्र नाही. अखेर दिवस सरता सरता आजोबा परसदारी उगवतात. नातवाला मध्यस्थ करून सारी चौकशी करतात. कुणाची? तर जिच्या नावाने आंघोळ केली तिचीच! 'ती जेवली का?', 'कशी आहे ती?', 'माझं चुकलंच'... वगैरे. मग हळूच घरात शिरतात. श्रीखंड ओरपतात. झालं! मिटलं की भांडण. हे 'घरपण' असणारं 'प्रेमाचं भांडण'!

पण हल्ली घरोघरी शिरली आहेत ती वेगळीच भांडणं. तीही असतात सासूसुनांची, नवराबायकोची, पत्नी आणि प्रेयसीची, मुलामुलींची. पण त्यालाच आपण 'करमणूक' म्हणतो. अहो, ही भांडणं असतात टी.व्ही.च्या पडद्यावरची. सासू सुनेला पीडते; आपल्याला करमणूक ठरते! बायको किंवा नवरा बाहेर लफडी करतो अन् आपण ती चवीनं पहातो! एकाच घरात राहून माणसाला माणूस कळत नाही; मग त्यांच्या भूतकाळात आपण रमतो! केवळ करमणूक म्हणून होणारे हास्यविनोद, हास्यमालिका तशा पहातो म्हणा आपण; पण त्यात रोज आता या संघर्षाचं काय होणार?- अशी उत्सुकता आपल्याला नसते. घर, वाडा, ऑफिस, चाळ.... सगळ्या वेगवेगळ्या ठिकाणी आपण ही भांडणं रोजच्या रोज 'एन्जॉय' करीत असतो. आपल्या घरात आगन्तुक असलेली किंवा आपणच घरात घेतलेली ही भांडणं आपलं 'घरपण' घालवतात; असं कधी नाही वाटत? 'भांड्याला भांडं लागलं' की नाद होतो. हा नाद वास्तूला अहितकारक असतो म्हणे. मग घरभर टी.व्ही.चा आवाज भरून राहणारी/टाकणारी ही भांडणं आपण चवीचवीनं, चर्चा करत ऐकतो, पाहतो; ते का?

जाऊ दे. असले प्रश्न विचारतच नाही मी. हो! उगाच तुमच्या-माझ्यामध्ये भांडण कशाला ना?

*

## प्रकाशातील परभू
# श्री. प्रदीप शामराव कोठारे



'प्रभुतरुणा'ने 'इतरेतर ऋणानुबंध' जपताना फार पुण्याई जोडली आहे. सकारण, अकारण अनेकजण प्रभुतरुणाच्या परिवारातलेच होऊन गेले आहेत. त्यातीलच एक नाव म्हणजे प्रदीप कोठारे. कै. सुहास कोठारे आणि कै. विहंग नायक यांचे सुहृद असल्याने गेली ४८ वर्षे ते प्रभुतरुणाशी जोडले गेले आहेत. विहंग गेल्यावरही माझ्या कारकिर्दीत प्रभुतरुणाचे काम त्यांनी आपले मानले. म्हणूनच गेली दहा वर्षे ते दर महिन्याला 'हसरी रेखा' सादर करताहेत. गेली १९ वर्षे दिवाळी अंकाला त्यांची हास्यचित्रे शोभा आणताहेत. 'कार्टुनिस्ट कंबाईन'च्या शिबीरात त्यांना आमंत्रित केले होते आणि तेथील प्रदर्शनात त्यांच्या व्यंगचित्रांना प्रसिद्धी दिली गेली. मला वाटते; आपल्या ज्ञातीतील व्यंगचित्रकारांत पहिला मान त्यांचाच.

'न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनी'त नोकरी करतानाही त्यांनी कार्यकर्ता म्हणून योगदान दिले आहे. कंपनीच्या 'कल्चरल विंग'मध्ये ते कार्यवाह होते. मराठी वाङ्मय मंडळाचे कार्यवाहपद त्यांच्याचकडे होते. कंपनीच्या स्थानीय लोकाधिकार समिती आणि निवृत्त कर्मचारी संघटना स्थापनेत त्यांचा मोलाचा सहभाग होता. 'विल्सन हायस्कूल'चे ते विद्यार्थी होते. या नात्याने ते त्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या कार्यकारिणीवर आहेत.

ज्ञातिसंस्थांमध्येही त्यांचा महत्त्वाचा वाटा आहेच. 'सोशल क्लब'चे ते दहा वर्षे संयुक्त कार्यवाह होते. ४५ वर्षे या संस्थेशी जवळीक साधताना त्यांनी प्रसंगी या संस्थेची महत्त्वाची 'कोर्ट मॅटर्स' सांभाळली. 'सोशल समाज'चे पुनुरुज्जीवन करण्यात त्यांचा सहभाग होता. दिवाळी गॅदरिंगमध्ये नाटके सादर केली. काळाराम मंदिराचे ते ७ महिने विश्‍वस्त होते; तर झावबा राम मंदिरात त्यांनी एक वर्ष दररोज 'राजयोग' शिबीराचे आयोजन केले.

हौशी रंगभूमी हा त्यांचा विरंगुळा होता. १९७५ मध्ये त्यांना अखिल भारतीय आंतरविमा नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट अभिनयाचे पदक लाभले होते. अशी बरीच पारितोषिके त्यांच्या खात्यात जमा आहेत. पा.प्र. सोशल समाजातर्फे २००९ मध्ये 'ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील समाजसेवा सुवर्णपदक' लाभले होते. यावर्षी 'प्रभुप्रभात'तर्फे त्यांना पारितोषिक देऊन गौरविले गेले. या सेवेचे रक्तदान हेही स्वरूप आहे. २८ वेळा त्यांनी रक्तदान केले आहे. अनेक विवाह जमविले आहेत. समाजसेवेचा भाग म्हणून त्यांनी 'ग्लोबल इनिशियेटीव्ह ऑफ टोबॅको अव्हेरनेस'चे उपक्रम विविध शाळा-कॉलेजमध्ये राबविले आहेत. गेल्या २२ वर्षांपासून ते ब्रह्मकुमारी ईश्‍वरीय विश्‍वविद्यालयाशी निगडीत असून अनेक उपक्रमांत सेवाधारी म्हणून त्यांचा सहभाग असतो. यातूनच त्यांनी दिव्यांग मुलांचे 'स्टेज शो'ही आयोजित केले.

त्यांच्या आयुष्यातील 'हसरी रेखा' असणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. सुरेखा प्रदीपच्या कार्याला 'मम'म्हणत असतात. त्यांना प्रेरणा देत असतात. या आधीही मी संपादकीयात प्रदीपवर लिहिले आहेच.

'प्रभुतरुणा'च्या या सुहृदाचे अभिनंदन.

## प्रभुप्रभात वर्धापनदिन

दरवर्षीप्रमाणे १ मे रोजी प्रभाताचा वर्धापनदिन साजरा झाला. अध्यक्ष होते डॉ. राहुल नवलकर. याप्रसंगी श्री. शशांक श्रीकांत रणजीत, श्री. विश्वास नारायण अजिंक्य आणि सौ. गीता धराधर आंबवणे यांना विद्येश्वरी पुरस्कार देण्यात आले. त्याचप्रमाणे सुवर्णपदकांचे मानकरी होते - डॉ. उदय रघुनंदन गोरक्षकर, सौ. जयश्री तळपदे, श्री. प्रदीप कोठारे, सौ. शिल्पा नवलकर, श्री. प्रणवेश मूर्ती धैर्यवान, श्रीम. दीपिका कोठारे, श्री. संदीप त्रिलोकेकर, सौ. शेफाली विजयकर, कु. संकिता अजिंक्य, कु. रश्मी व्यवहारकर, श्री. महेश कोठारे. वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त 'आलाय मोठा शहाणा' हा नाट्यप्रयोग झाला.

## अभिनंदन

✶ 'ठाणे नगर वाचन मंदिर' या संस्थेचा १६७वा वर्धापन दिन ११-४-२०१७ रोजी पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या होत्या प्रा. सुहासिनी कीर्तिकर. त्यांनी 'वाचनसंस्कृती आणि आस्वादप्रक्रिया' या विषयावर भाषण केले.

✶ सौ. जयश्री तळपदे-कर्नाटकी यांना महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्र लोकगौरव पुरस्कार लाभला.

✶ सौ. गीता आंबवणे-धराधर यांचा ठाणे येथील कला अकादमीतर्फे खेड्यातील महिलांना जीवनशिक्षण दिल्याबद्दल गौरव करण्यात आला.

✶ डॉ. सुमन नवलकर यांच्या 'नि:शब्द' कादंबरीवर 'ललित'च्या 'दृष्टिक्षेप'मध्ये परीक्षण प्रसिद्ध झाले. हे 'दृष्टिक्षेप' सदर प्रा. सुहासिनी कीर्तिकर चालवतात.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

# अच्छे दिन आयेंगे

-जयमती जयपाल तळपदे

बऱ्याच वेळा असे म्हटले जाते की, कुटुंबव्यवस्था विलयाला जात आहे. समाजात घटस्फोटांचे प्रमाण वाढत आहे आणि त्यामुळे 'लिव्ह इन रिलेशन्स' किंवा एकल मातांचे प्रमाणपण वाढत आहे. हे विधान अगदी शंभर टक्के खरे असले तरीही मला पन्नास वर्षांनंतर 'कुटुंब' नावाच्या संस्थेची ओळख मुलांना फक्त शालेय पुस्तकातूनच करून द्यावी लागेल असे मात्र मुळीच वाटत नाही.

हे मूळातच का घडतंय याचा विचार करू या. आत्ता मध्यमवयीन किंवा थोडे वयस्कर असलेल्या आमच्यासारख्या आईबाबांनी दोन टोकांच्या परिस्थितीला तोंड दिले आहे. आमच्या लहानपणी फक्त पुरुषमाणसे कमावती असत. घरात विधवा स्त्रिया, मुले भरपूर आणि त्यामुळेच अगदी मोजक्या पगारात आणि अगदीच नगण्य चैनीत आम्ही वाढलो. स्त्रियांचे शिक्षण तेव्हा वाचनापुरते आणि काहींचे मात्र मॅट्रीकपर्यंत झालेले होते. (म्हणजे आमच्या आया).

स्त्रीशिक्षणाचे महत्त्व तोपर्यंत कळल्यामुळे मुली शिकू लागल्या. स्वतंत्र विचार करू लागल्या. तोपर्यंत घरातल्या मुलांची लग्ने होऊन घरातील माणसे वाढली. मग जागा अपुरी पडू लागली. मुली शिकून नोकरी करू लागल्या आणि नवरा बायकोच्या वाढत्या कमाईमुळे स्वतंत्र जागा घेण्याची स्वप्नेही पाहू लागल्या. जागेच्या अडचणीमुळे एकत्र कुटुंब व्यवस्थेवर पहिला घाला बसला. तेथेही जेथे एकुलता एक मुलगा होता तेथे तो आईवडिलांना बरोबर घेऊन गेला. पण जेथे मुलगे जास्त होते, तेथे मात्र मीच का; आणि तूच का; अशी मारामारी चालू झाली. हे सगळे आमच्या पिढीपासूनच चालू झाले. काळ असेल सन १९७० च्या आसपासचा. जेथे वडील माणसे निरोगी असतील आणि कुटुंबासाठी उपयोगी असतील तर त्यांचा स्वीकार होऊ लागला. अर्थात् अशीही काही कुटुंबे होती जेथे वडीलमाणसांचे प्रेमपूर्वक आदराने केले जाई. काही कुटुंबातील मुले बाहेर पडली; पण त्यांनी विभक्त राहून एकमेकांशी अगदी जवळचे संबंध ठेवले.

दळणवळणाची साधने वाढली आणि शेट्टी, पंजाबी अशी मंडळी आपले प्रांत सोडून पुणे मुंबईसारख्या शहरात पोटापाण्यासाठी दाखल झाली. हातात पैसा असल्यामुळे आणि पतीपत्नी दोघेही नोकरी करत असल्यामुळे या लोकांच्या ताटात आयत्या मिळणाऱ्या अन्नाची आम्हाला चटक लागली. त्याचीच पुढची आवृत्ती म्हणजे आजचे पिझ्झा आणि बर्गर्स.

आमची मुले इंग्लीश माध्यमातून शिकली कारण पुढचे सारे उच्च शिक्षण त्यांना याच भाषेतून घ्यायचे होते. त्यामुळे त्यांच्यावर वाईट नाहीत; पण आपले संस्कार कमीच झाले. जेथे वडिलधारी मंडळी घरात होती तेथे त्यातल्या त्यात ही हानी कमी झाली. पण जे संस्कार आमच्या वडिलधाऱ्यांनी आमच्यावर केले ते संस्कार आमच्या मुलांवर करायला आम्हाला वेळच नव्हता. त्यानंतर आला ग्लोबलायझेशनचा काळ. शैक्षणीक कर्ज सहज मिळू लागले. मुले उच्च शिक्षणाठी परदेशी जाऊ लागली. तेथील संस्कृती, स्वातंत्र्य याची त्यांना भुरळ न पडली तरच नवल. 'मी', 'माझी प्रगती', 'माझे आर्थिक उत्पन्न' या दृष्टीने परदेशात त्यांना जास्त संधी होत्या. तेथे जीवन जास्त लोभसवाणे होते; त्यामुळे मुले तिथेच राहिली किंवा परत आली तरी सर्व 'मीपण' आणि माझेपण घेऊनच. मुलीही शिकल्या. आम्ही त्यांना फार लाडात वाढविले. त्यांना तडजोड करावी लागलीच नाही. आम्ही अगदी हवे ते सर्व त्यांना दिले. मग त्यांनी 'मी' पलीकडे जाऊन विचार कसा बरे करावा? अर्थात् हे सर्वच घरात झाले असे नाही. हे सर्व जास्त करून मुंबई, पुणे यासारख्या शहरात जास्त प्रमाणात घडले. बाकी ठिकाणी अजूनही कुटुंबे एकत्र नांदतातच की!

आनंदवन, हेमलकसासारख्या ठिकाणी उच्च विभूषित ३/४ पिढ्या एकत्र नांदत आहेत. समाजासाठी कष्टत आहेत. याचे कारण त्यांच्यावर झालेले संस्कार. शिवाय वडिलधाऱ्या मंडळींना आपल्या कामातले काही कळते किंवा आपण त्यांच्याशी संवाद साधू शकतो असे जेव्हा तरुण पिढीला वाटते तेव्हाच ती आपल्याशी जवळीक साधू शकतात. आमच्या जमान्यात कंप्युटर, इंटरनेट, मोबाईल यासारखी बरीच उपकरणे अस्तित्वात आली. आमच्या मुलांनी त्यांच्याशी लगेच दोस्ती केली. पण आम्हाला सगळ्यांनाच या गोष्टी जवळच्या वाटल्या नाहीत. पावसात कडमडत कसली कसली बिले भरायला जाण्यापेक्षा ती मोबाईलवरूनच भरावीत हे अजूनही कित्येक जणांच्या पचनी पडलेले नाही. एखाद्या गोष्टीसाठी तासन्‌तास रांगेत उभे रहाण्यापेक्षा जास्त पैसे खर्च करण्यापेक्षा आम्ही स्वत:ला का बदलू नये? विज्ञानाबरोबर आणि विज्ञानामुळे

(पान ५ कॉलम ३ वर)

कथाकली

# क्लोन की तोतया

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

अमोल घरी आला तोच मुळी आनंदात... आल्या आल्या त्यानं शर्वरीला हाक मारली - 'शर्वरी, लवकर ये. चहा वगैरे नंतर कर...'

''काय रे? एवढं काय झालंय?'' - शर्वरीनं बाहेर येता येता विचारलं.

''तू आज रजा घेतलीयस ते उत्तमच झालं. आजचा हा क्षण एन्जॉय करूया. अगं, आता आपण उत्कर्षचं क्लोनिंग करू शकणार आहोत. मी सगळं विचारून... विचारूनच काय; ठरवूनच आलोय. डॉ. अथर्व साने आहेत नं, त्यांना भेटून आलो.

''खरंऽऽच?'' - शर्वरीनं थोडंसं आनंदानं विचारलं... पण पुढच्याच क्षणी ती अत्यंत गंभीर झाली. तिला तसं विचारात गढलेलं बघताच अमोलनं विचारलं, ''काय झालं? कसला विचार करतेयस?''

''अं... अमोल, आपण हा निर्णय घेतोय खरा... पण... खरंच सगळं व्यवस्थित होईल नं?''

''न व्हायला काय झालं? अगं हा काळ कोणता नी तू बाबा आदमच्या जमान्यातल्या शंका काय विचारतेयस? अगं, बावीसावं शतक आहे हे...''

''खरंय रे... पण...''

''क्लोनिंग नवीन संकल्पना असल्यासारखं काय बोलतेयस? आत्तापर्यंत केवढेतरी प्रयोग झालेयत नं जगात?''

''हो. पण माणसांवरचे प्रयोग फारच थोडे झालेयत रे. आत्तापर्यंत झाले ते प्राण्यांवरचे प्रयोग. मांसाहारी लोकांना खाण्यासाठी हिंस्त्र श्वापदांना अन्न पुरविता यावं म्हणून काही प्राण्यांचं क्लोनिंग झालं खरं. पुष्कळशा देशांनी या प्रयोगांना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच परवानगी दिली आणि प्रयोगांना सुरुवातही केली. त्या प्रयोगांमुळे काही प्रमाणात सजीवांच्या अन्नाचा प्रश्न सुटला हे खरंय. पण ते प्राणी होते. त्यांना त्वरित मारलंदेखील गेलं. त्या क्लोन्समध्ये त्यांचं क्लोनिंग ज्या प्राण्यांवरून झालं त्या प्राण्यांचे सगळेच्या सगळे गुणधर्म तंतोतंत उतरले की नाही हेसुद्धा तपासून पाहिलं गेलं. पण प्राण्यांना स्वभाव नसतो रे.''

''हे काहीतरीच. अगं खूप मागे एक लेख वाचला होता. त्यात घोड्यांची लक्षणं लिहिलेली होती - अमुक प्रकारचा घोडा मालकाचं ऐकतो नी तमुक प्रकारचा पिसाळतो इ. इ. म्हणजे प्राण्यांनाही वेगवेगळा स्वभाव असतोच ना?''

''हो पण मी मघाशी म्हटल्याप्रमाणे जे क्लोन केले गेले ते प्राणी लगेचच मारलेही गेले नी जातायत. इथे आपल्या मुलाच्या क्लोनिंगचा प्रश्न आहे. दुसरा मुलगा आपल्याला वाढवायचा आहे. त्याचे स्वभाव विशेष पहिल्यासारखेच असतील का; हा मूळ प्रश्न! जरी सवयी सारख्या असल्यातरी जीन्स जसेच्या तसेच उतरतील का याबाबत अजून तरी ठोस पुरावा मिळालेला नाही.''

''तो ही कालांतरानं मिळेलच गं. आता क्लोनिंग झालेली मुलं खूप लहान आहेत. अगं माणूस स्वाभाविकरित्या जन्मलेला असला तरी लहानपणी स्वभाव वेगळा आणि मोठेपणी वेगळा हे चित्र दिसतंच नं?''

''तेच तर म्हणायचंय मला. दुसऱ्याचा स्वभाव मोठेपणी नेमका कसा होईल हाच तर प्रश्न आहे.''

''काहीतरीच असतं हं तुझं शर्वरी! अगं ज्यांना नैसर्गिक रीतीनं झालेली दोन मुलं आहेत, ते काय करतात? तुझ्यासारखा विचार करत बसलं तर दुसऱ्या मुलाला जन्म देणं नकोच; असंच वाटेल नं? जुळ्या मुलांचा स्वभावही सारखा असतोच असं नाहीय नं?''

''ए, खरंच... त्या दोघांना जुळी पण म्हणता येणार नाही नं आपल्याला?''.... शर्वरी क्लोनचाच विचार पुढे नेत म्हणाली, ''आणि हो, त्या क्लोनिंग झालेल्या बाळाचं वय काय असेल? उत्कर्ष आत्ता तीन महिन्यांचा आहे... तेवढंच असेल की काही दिवसांचं? त्यांच्या उंचीत दिसण्यात काय साधर्म्य असेल की वेगळेपण?... नेमकं कोणत्या बाबतीत? आणि जर... दोघांच्याही स्वभावात खूप रागीटपणा आला तर? दमछाक होईल रे आपली दोघांना आवरता आवरता... त्यापेक्षा... अं... नकोच ते...''

''झाऽऽलं! खाल्ली कच?.... अं.... शर्वरी... खरंच गं आपले जीन्स घेऊनच उत्कर्ष झालाय नं? तो ही असाच तुझ्यासारखा कचखाऊ झाला तर?... आणि.... बापरे! त्याचा क्लोनसुद्धा तस्साच कचखाऊ झाला म्हणजे तर माझ्या हालांना पारावार राहणार नाही.''..... घाबरण्याचा अभिनय करीत अमोल म्हणाला.

''सारखी थट्टा काय करतोस प्रत्येक गोष्टीची?.... अरे... समजा... उत्कर्ष आणि तो दोघेही तुझ्यासारखेच झाले तर? बाप रे! तिघांची थट्टा एकाच वेळी सहन नाही होणार हं मला...''

''शर्वरी, हे तर कोणत्याही आईला पडणारे प्रश्न आहेत. या प्रश्नांची उत्तरं तर काळच ठरवेल नं? तू त्यातल्या चांगल्या घटकांचा विचार का करत नाहीयेस? आपला उत्कर्ष तर टेलरमेड आहे. आपल्याला हव्या त्या रंगरूपाचा मुलगा आपण मिळवला. हे या नवीन विज्ञान युगात शक्य झालंच नं?''

''पण तुला माहीत नाहीय अमोल - उत्कर्षचे निळे डोळे आणि कुरळे केस बघून त्याला बघायला येणारी प्रत्येक आत्या, मावशी, काकू, नणंद, मामी विचारत होती - ''ए ह्याचे डोळे निळे नि केस कुरळे कसे? दोन्ही घराण्यांमध्ये असे कुणाचेच नाहीत.'' आणि शी; रागच आला मला त्यांचा. माझ्याकडे चक्क संशयानं बघत होत्या त्या. बाविसाव्या शतकातल्या असल्या तरी आजचं विज्ञानयुग त्यांच्या मेंदूत शिरून मनाच्या वाटेनं जिभेवर उतरत नाहीय् नं! या बाबतीत अजून अठराव्या शतकातलेच विचार करतात त्या. आणि आता हा क्लोन - हा सुद्धा निळे डोळे नी कुरळे केस घेऊनच येणार म्हणजे त्या बायकांचा संशय दृढ होणार...''

''होऊ दे गं. तू लक्ष नको देऊस तिकडे. आपण आपल्या बाळावर लक्ष केंद्रित करू.''

''एऽऽ, आपण उत्कर्ष एक दोन वर्षांचा झाल्यानंतर क्लोनिंग केलं तर?''

''शर्वरी, दोन वर्षांच्या मुलाला अचानक जगात आल्याची जाणीव किती भयंकर वाटेल, कळतंय का तुला? त्याच्या अजाणत्या वयातच त्याला या जगात आणावा लागेल.''

''नातेवाईकांना माहीतच असेल नं की हा जुळा नाही. बाहेरसुद्धा दोघांच्या जन्मतारखा फक्त तीन चार महिन्यांच्या अंतरावरच्या सांगतांना काय वाटेल त्यांना? काय प्रतिक्रिया येतील रे? त्या क्लोनला तो 'क्लोन' आहे, ओरिजीनल नाही ही जाणीव मोठं झाल्यावर किंवा लहानपणीच शाळेतल्या, कॉलेजमधल्या मुलांनी, नातेवाईकांनी, ओळखीच्यांनी करून दिली तर? .... खरं तर अशा मोठ्या वयाच्या व्यक्तींना 'तोतया' सुद्धा म्हटलं जाईल. माझे आजोबा एक खूप जुनी भवाळपूर संस्थानाच्या राजाची कहाणी सांगायचे; त्यांच्या आजोबांनी त्यांना सांगितलेली. एक तोतया राजा म्हणून शिरला होता म्हणे. खूप गाजली होती म्हणे ती केस.... लोकांनी उत्कर्षच्या क्लोनला किंवा चुकीनं उत्कर्षालाच तोतया ठरवलं तर? काय वाटेल त्याला?''

''आपण समजावून सांगू नं त्याला. तोपर्यंत ही संकल्पना सर्वांनाच माहीत झालेली, अंगवळणी पडलेली असेल, कारण तोपर्यंत अशा आणखी काही केसेस तयार होतीलच.''

''अमोल, समजऽऽऽ, अशी बरीच माणसं तयार झाली तर? पृथ्वीवर हाहा:कार माजेल, इतक्या माणसांसाठी शाळा, कॉलेज, नोकऱ्या, घरं, खाणं पिणं, त्यासाठी लागणारा पैसा, हॉस्पिटल्स... बाऽऽपरे! सगळंच जगड्व्याळ होईल रे... तेवढ्या मोटारी, वाहनं, विमानं, नी हो ड्रोन्ससुद्धा... पृथ्वीवर, आकाशात नुसती गर्दीच गर्दी होईल. प्राण्यांसाठीचे पांजरपोळही अपुरे पडतील. इमारती कमीत कमी तीनशे मजल्यांच्या होतीलही. पण जमीन तेवढीच राहील ना रे?'

''मग लोक चंद्रावर, मंगळावर राहतील.'' अमोल खो खो हसत म्हणाला - ''उगीच काहीतरी विचार करू नकोस.''

(पान ५ कॉलम ४ वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



भूतांच्या गोष्टी- भाग २

# अद्भूत गोष्टींचा संग्रह

*काही लोकांनी सांगितलेले त्यांचे अनुभव*

-विनय त्रिलोकेकर

## रक्तपिपासू (Blood suckers)

प्रशांतने सांगितलेला किस्सा ऐकला. पण मला त्याच्या आईचा लंडनचा अनुभव आईच्याच तोंडून ऐकावयाचा होता. थोड्या वेळाने ती आम्हा सर्वांसाठी चहा घेऊन आली.

''मी तुम्हाला कदाचित ती गोष्ट सांगितली नसेन, पण सिद्धार्थ आणि त्याच्या आईला त्या अनुभवाबद्धल माहीत आहे. ही माझ्या कपाळावरची खूण दिसते?''

खरोखर एक लांब खूण- कपाळावर डोक्यापासून उजव्या भुवईपर्यंत, पुसट, पांढरी रेषा दिसत होती.

"Uncle, it was quite wide and deep, almost an inch in width. The whole face had swollen and the wound was terrible – all dark red. When we saw after she returned from London we were aghast,"

नीती, प्रशांतची बायको मला सांगत होती,

"We wanted it sutured by a doctor. But mummy simply refused. It has now healed on its own. Now what you see is just this white scar which doesn't look so terrible and scary ---"

नंतर प्रशांतच्या आईने सांगण्यास सुरुवात केली:

आम्ही, मी आणि माझ्या बहिणी, 'राज ट्रॅव्हलस'चे युरोप- पॅकेज घेतले, लंडन त्यात नव्हते. पण लंडन आमचे केंद्रबिंदू- 'ट्रान्झिट पॉइंट' होते. एअर इंडियाच्या विमानाने आम्ही लंडन विमानतळावर उतरलो आणि जवळच्या एका 'मोटेल' (खानावळ)मध्ये जेवण केले व थोडा आराम करून संध्याकाळी युरोपच्या १० दिवस, ९ रात्रीच्या प्रवासाला निघालो. युरोप अतिशय सुंदर आहे,हो! सर्वात जास्त मला रोम आणि जर्मनी आवडले. आम्ही बरीच खरेदी केली. आमच्या आर्यनसाठी खेळ- खेळणी, कपडेलत्ते, ह्यांच्यासाठी जिन्स (हे किती घालतात, देव जाणो!) बरेच काही! आमची दमछाक झाली खरी; पण वेळ मजेत गेला. युरोपात विशेष असे काही घडले नाही.

आम्ही लंडनला परत आलो. संध्याकाळ झाली होती. एका पॉश हॉटेलमध्ये व्यवस्था केली होती. मला त्या हॉटेलचे नाव आठवत नाही, तसे तेथील हॉटेलांची नावे उच्चारणे इतके कठीण! मग ती लक्षात कशी काय ठेवणार? विमानतळावरून एका लक्झरी बसने थेट हॉटेलवर गेलो. हॉटेल विमानतळापासून जवळच असावे. हॉटेल मोठे आणि तीस मजली होते. आम्ही सारे आत गेलो व हॉटेलच्या लॉबीतल्या 'वेटिंग' कक्षात बसलो.

हॉटेलमध्ये शिरल्यापासूनच काहीतरी वाईट होणार ह्याचे संकेत जणू काय मिळू लागले. आमची एन्ट्रीच 'बॅड लक'ने सुरू झाली.एका बाईच्या उजव्या हाताचा पंजा लॉबीच्या फिरत्या दरवाजात अडकून फाटला. तिला बाजूलाच असलेल्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. आम्हाला कोणती रूम देतात; ह्याची वाट बघत आम्ही बाकी सारे लॉबीतच बसलो होतो. एका कुटुंबाला रूम देण्यात आली आणि ते सारे- नवरा, बायको, दोन छोटी मुले आणि मुलाची म्हातारी आई (ती आई असल्याचे मला नंतर समजले) बेल-बॉय पाठून लिफ्टमध्ये शिरले. लिफ्टचा दरवाजा त्यांच्यामागे बंद झाला. पण लिफ्टचे दार लगेचच उघडले आणि ती म्हातारी एक हात आपल्या मुलाच्या खांद्यावर तर दुसरा आपल्या सुनेच्या खांद्यावर ठेऊन स्वत:ला सावरत- सावरत एका पायावर लंगडत लिफ्ट बाहेर पडली. तिच्या उजव्या पायाच्या अंगठ्याला दुखापत झाली होती. तिलाही त्याच हॉस्पिटलात नेण्यात आले.

साऱ्या हॉटेलच्या सर्व कर्मचाऱ्यांची, बेल-बॉय ते लॉबी मॅनेजरपर्यंत सारे, तत्परता वाखाण्यासारखी होती. ज्या पद्धतीने मॅनेजरने भराभर पाऊले उचलून तातडीने निर्णय घेतले, त्यांनी जरासाही वेळ वाया घालवला नाही . दोघींना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये पाठविले. नंतर त्यांच्या सर्व घरच्या माणसांचे समाधान केले आणि हॉस्पिटलमध्ये होणाऱ्या उपचारांचा तपशील, अगदी तासातासांचा इत्थंभूत तपशील आम्हाला दिला. सारे पद्धतशीर. आम्हा सर्वांना त्यांचे कौतुक वाटले.

आम्हाला, मला व माझ्या तीन बहिणींना ६व्या मजल्यावरील दोन खोल्या, रूम नंबर ६६५ व ६६६, देण्यात आल्या. आमचे सामान आम्ही बेलबॉयमार्फत वर रूमवर पाठविले आणि लॉबीतच थांबलो. बहुसंख्य लोकांनी तसेच केले. त्या दोघीही हॉस्पिटलातून परत आल्या. एकीच्या हाताला तर; दुसरीच्या पायाला जाडजाड बँडेज होते. पण दोघीही हसत-हसतच आत शिरल्या आणि 'thumps- up' ची खूण केली. सर्वांनी टाळ्या पिटून त्यांचे स्वागत केले. हे सर्व आटोपल्यानंतर आम्ही सारे हॉटेलच्या डायनिंग हॉलमध्ये एकत्रित जेवण्यास गेलो.

रात्रीचे साडेअकरा वाजून गेले होते. आम्ही बहिणी लिफ्टने सहाव्या मजल्यावर आलो. माझी सर्वात मोठी बहीण व तिच्यासोबत सर्वात धाकटी बहीण रूम नंबर ६६५ मध्ये शिरल्या, घुसल्याच म्हणा. मी व माझ्याबरोबर असलेल्या बहिणीनी त्या खोलीत असलेल्या आमच्या बॅगा बाहेर आणल्या आणि त्या दोघींना 'गुड नाईट, स्वीट ड्रीम्स' करीत बाजूच्या रूम नंबर ६६६ कडे गेलो.

खोली मोठी आणि प्रशस्त होती. दाराच्या समोर ओक लाकडांचे फ्रेमवर्क असलेली मोठी खिडकी. खिडकीला स्लायडिंग काचा, त्याही ओक लाकडाच्या कोंदणात. खोलीत त्याच लाकडाने बनविलेले इतर फर्निचर- दोन कपाटे, ड्रेसिंग टेबल, दोन 'सिंगल बेड', लाकडी रंगाचेच फ्रीज, कोपऱ्यात टेबलावर लाकडी रंगाचा टेलिफोन आणि दोन पलंगामध्ये होते कॉमन साईड/सेन्टर टेबल; ज्यावर सुंदर नक्षीदार काच. रात्र फार झाली होती. आम्ही दोघीने आपल्या आंघोळी आटोपल्या. बाथरूम भव्य आणि परिपूर्ण होती. टबच्या गरम पाण्यात झोपूनच रहावे असे वाटत होते. आम्हा दोघींनाही प्रवासाचा शीण आल्यामुळे पलंगावर टेकताच आम्ही दोघीही पटकन् झोपी गेलो.

अचानक मला जाग आली आणि तिलादेखील. खिडकीच्या काचा जोरजोराने हादरत होत्या. वादळ असावे? आम्ही दोघी खिडकीजवळ गेलो व पडदे सारून बाहेर पहिले. खाली दिसणारी झाडे पहिली. झाडांच्या फांद्या सोडा, एक पानदेखील हलत नव्हते. काहीच हलत नव्हते. हळुहळू काचाचे हादरणे कमी होत गेले आणि बंद झाले.

''काय गं सुनीता, हे सारे चमत्कारिक वाटते नं?''

''हं!''

''बघ न, बाहेर पाऊस ना वारा, मग काचा कशा काय हलत होत्या? असे वाटत होते जणू कोणी बाहेरून हवेतून ढकलत असावे. भुताटकीतर नसेल?''

''हे चूप, काहीतरी बडबडू नकोस!'' मी तिला ओरडूनच गप्प केले.

मग आम्ही परत झोपण्यास आपआपल्या पलंगावर गेलो. आम्हाला झोपही लागली. मी कसल्याशा आवाजाने जागी झाले. काचेची खणखण? कोठे काच फुटली वाटते? मी अर्धवट झोपेत आणि त्यात खोलीत गडद अंधार, मी पलंगावरून खाली उतरण्याचा प्रयत्न केला खरा. पण मी धडपडले, माझा तोल गेला आणि माझे डोके धाडकन् बाजूच्या साईड टेबलच्या काचेवर आपटले. मला भोवळ आल्यासारखे झाले. आपल्याला खोक पडली असावी. कारण कपाळापासून भुवईपर्यंत रक्त घरंगळत असल्याची जाणीव मला होत होती. रक्त आता माझ्या पापण्यावर आले आणि खाली येत नाकावरून पार ओठांपर्यंत आले असावे. कसेबसे माझे हात स्वीचला लागले. दिवा लागला. बाजूला खुर्चीवर सुकत घातलेला टॉवेल उचलून मी तो कपाळावर दाबला. आता रक्त थांबले असावे.

''सुनीता, बापरे केवढी मोठी ही खोक! रक्त कसे येत नाही?''

''ते ह्या टॉवेलने पुसले.''

''पण ह्या टॉवेलला रक्त कसे नाही? सुनीता, तूच बघ. आहे?''

खरोखर टॉवेलवर (पुढे वा मागे, कोठेही) रक्ताचा एकही लाल डाग नव्हता. टॉवेल साफ कोरडा! बहिणीने भान ठेऊन रूमसर्विसशी संपर्क साधला. हॉस्पिटलमधून डॉक्टरांना बोलावण्यात आले. त्यांनी मला इंजेक्शन दिले. माझी जखम पाहिली आणि ५-६ टाके लागतील असे सांगितले. पण मी तसे करण्यास नकार दिला. जखम सुकली होती. पण रक्त कोठेही सांडले नव्हते. टेबलवरची काच फुटली तर नव्हतीच पण त्यावर रक्ताचा एक ठिपकाही नव्हता. जमीनही कोरडी. काचेला अणकुचीदार कोपराही नव्हता, चारही कोपरे गोलाकार होते. मग खोक कशी पडली? आणि माझे वाहत असणारे रक्त गेले तरी कोठे? हे सारे प्रश्न मला भेडसावत होते. आणि दोघींचे रक्त? त्यांचेही रक्त कोठेच पडलेले दिसले नाही. लिफ्टमध्ये, लॉबीमध्ये , कोठे म्हणून कोठेच रक्त सांडले नव्हते.

मग इतके सारे रक्त गेले तरी कोठे? त्या हॉटेलात काही होते ते रक्तपिपासू तर नव्हते ना?

### रक्त शोषणारे रक्तपिपासू!

आणि २१जुलै, २०१४, 'मुंबई मिरर' ह्या दैनिकात असे वाचले:

*England cricketers, including Board, complain of mysterious goings-on at their London hotel.*

In a bizarre development, several England cricketers have requested a change of rooms, saying their five-star London hotel is haunted. According to Daily Mail on Sunday, the players' wives and girlfriends have refused to stay at the famous Langham Hotel during London Test matches this summer after complaints of mysterious goings-on at night. "During the Sri Lanka Test I had to move rooms," Stuart Broad was quoted as saying by the British daily.

"It was so hot in the room I just couldn't sleep. All of a sudden the taps in the bathroom came on for no reason. I turned the lights on and the taps turned themselves off.

Then when I turned the lights off again the taps came on. It was very weird. "It really freaked me out. I ended up asking to move rooms. Bealey (Broad's girlfriend) was

(पान ५ कॉलम १ वर)

# Old age- Blessing or Curse?

**- Ranjana Talpade**

Our parents have brought us in this world to enjoy the beauty of nature & to lead to life to the fullest extent. Every living being is perishable. Nobody lives forever this is a law of nature. But the period between birth and death is not in our hands, it is upto see how to spend it whether with greenary or with darkness. This cannot be left to the nature.

In the olden days or even in the villages we have seen there were joint families. The head of the family is the whole & sole and his decision used to be final which everyone has to follow. This system still exists in villages and in the nature part of India. But now-a-days in the metro cities joint families have been replaced by nuclear families. i.e. ''Hum do, hamare do ya ek.'' This has happend due to the education system which has changed the mentality of the people. The moment a boy or a girl gets married, he/she shifts to a new home either given by the parents or self-earned. In the early 60s-70s joint families did exist in cities but this trend has been changed in the near 10-15 years. This system can survive only where the couple has 2-3 children out of which the parents can stay with either of them. But a family who is having only one child will not be able to survive without any moral support or at times even financial support. We see that the son, after some years of marriage gets fedup of the old parents and shows them the door of old-age homes. This is very ridiculous and unfair as a result, parents undergo depresson & lonelyness.

On the other hand we can see many daughters even after their marriage take care of their parents and inlaws too. A best example is of my own home. We are two sisters without any brothers. My elder sister got married and I am 10 years younger to her. She was taking care of our parents and inlaws inspite of handling her responsibilities in office. By the time I became an adult, my parents were too old. My acadamic career ended at the age of 25 and I started working after that. I too contributed a little to serve my parents. They were very satisfied and lead a peaceful life. They never felt the pinch of not having sons. Ofcourse that is all god's grace. Now I am single and my sister also is releaved from all the responsibilities. We are proud to say that we have served and taken care of our parents till the end of their life. Their blessings are always with us.

Hence I want to mention here that old age is not always a curse but it can be a blessing too. Only there should be a bit of understanding and support between the parents & the children who can make a home a heaven instead of hell. So youngsters; bear in mind that parents are the artists of our life's picture, please take care of them. We too are going to reach the same stage of life.

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

pretty spooked, too, and I know Moeen Ali's other half won't stay there because she's so frightened of the ghosts," the fast bowler added.

"I've slept okay during the current Test (against India) but the Sri Lanka Test (last month) was not great," added Broad. "One night I woke up in the middle of the night, around 1.30 a.m. and I was convinced there was a presence in the room. "It was the weirdest feeling." "Ben Stokes has had some problems sleeping as well. He's on the third floor, which is where a lot of the issues are.

I'm telling you, something weird is going on," said the Englishman. London's Langham Hotel that opened in 1865 is on the list of one of the most haunted hotels in the world and has been patronised by several literary greats, including Mark Twain, Oscar Wilde and Arthur Conan Doyle.

Reportedly, Room 333 is believed to be the most haunted with the hotel's own website stating: "In 1973 a BBC radio announcer James Alexander-Gordon awoke suddenly in the night to see a fluorescent ball which slowly took on the shape of a man wearing Victorian evening wear.

The announcer asked the ghost what it wanted and it began to float towards him, with its legs cut off some two feet below the ground, arms outstretched, eyes staring emptily. At this point the announcer got up and fled."

प्रशांतच्या आईने उलेख केलेले ते 'पॉश' हॉटेल LANGHAMच तर नसेल?

✳

---

**पाठारे प्रभु सोशल समाज आणि हौशी कला मंदिर** यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ११ जून, २०१७ रोजी सकाळी १० वाजल्यापासून कॅरम आणि बेझिकचे सामने आयोजित केले आहेत. अधिक माहितीसाठी सौ. नीता सेंजित ९८२०१६६६२८, श्री. जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५, श्री. अजित जयकर ९८२००६५०७७ आणि श्री. रोहील जयकर ९८१९०७००८९ यांच्याशी संपर्क करावा आणि बहुसंख्येने सहभागी व्हावे.

---

(पान २ कॉलम ४ वरून)

मिळणाऱ्या विविध सोयी आम्ही जर स्वीकारल्या, त्यासाठी लागणारे थोडेसे ज्ञान आम्ही मिळवले तर आपसूकच आम्ही त्यासंबंधी आमच्या मुलानातवंडांशी बोलू शकू. आता टेक्नीकल जगात वावरणाऱ्या आमच्या मुलांशी आम्ही त्यांच्याच भाषेत नाही बोललो तर आई किंवा बाबा किंवा आजोबा, तुम्हाला ते कळणार नाही; असे म्हणून संवाद तेथेच थांबेल. आता जमाना बदललाय. आपण वर्षानुवर्षे एकच वस्तू वापरत होतो. आताच्या मुलांना दर दोन महिन्यांनी प्रत्येक वस्तूची सुधारीत आवृत्ती बाजारात मिळते. त्यांना ती लगेच घ्यावीशी वाटते. आम्ही नेहमीच गरजेसाठी वस्तू घेतल्या. आता मुले हातात पैसा आहे म्हणून वस्तू घेतात. 'वापरा आणि फेकून द्या' ही परदेशी संस्कृती आपल्याकडे रुजत आहे. पण ते नेहमीच चुकीचे असते का; याचा सारासार विचार करून आपण आपला विरोध नोंदवला पाहिजे. मी म्हणतो तेच सर्व खरे किंवा योग्य असा अट्टाहास धरला तर मुले बंड करून उठतात. दोन पिढ्यांच्या विचारसरणीत फरक हा असतोच. पण त्याचे रुपांतर संबंधांमध्ये दरी येण्यात होऊ नये.

आमची पिढी पूर्वीइतक्या रुढी परंपरा, मंत्रपठण वगैरे करत नाही. वेळ कमी पडत असल्यामुळे व त्यातील विज्ञान माहीत नसल्यामुळे आमच्या पिढीनेही या गोष्टींकडे थोडे दुर्लक्ष तरी केले किंवा अर्थ न कळता त्याचे पालन केले. परंतू आताची पिढी वैज्ञानिक आणि शास्त्रीय दृष्टीने जास्त सजग आणि चौकस आहे. त्यांना प्रत्येक 'असे का'चे उत्तर हवे असते आणि ते जर आपण देऊ नाही शकलो तर ती गोष्ट मोडीत निघते. आपल्या संस्कृतीप्रमाणे केल्या जाणाऱ्या सगळ्याच गोष्टी जुनाट, टाकाऊ नाहीत. बहुतेक परंपरांना अर्थ आहे. वैज्ञानिक बैठक आहे. मंत्रांना अर्थ आणि सामर्थ्य आहे. पण हे जर आपण मुलांना योग्य रित्या पटवून देऊ शकलो नाही तर ते त्यावर विश्वास कसा ठेवतील? पण हेही तेवढेच खरे की काही रुढी परंपरांनी काळाच्या ओघात त्यांची उपयोगीता गमावली आहे. तेव्हा काळानुसार आणि गरजेनुसार बदलायला हवे.

आता पाश्चिमात्य देशातही पूर्वेकडील संस्कृतीचा, संगीताचा चालीरीतींचा अभ्यास होत आहे. त्यांनाही या सर्व गोष्टींचे आकर्षण वाटू लागले आहे. तेव्हा आता ती वेळ दूर नाही `जेव्हा आपली पाखरं परत आपल्या घरट्याकडे वळतील, त्यांना एकत्र कुटुंबपद्धतीचे महत्त्व कळेल. कारण त्यांच्या मुलांवर संस्कार करायला आजी आजोबा हवेतच ना? आता गरज आहे ती आजीआजोबांनी कंबर कसायची. विज्ञानाची कास धरून आपल्या पद्धती, मंत्रतंत्र जाणून घ्यायची, तसेच कॉम्प्यूटर, मोबाईल आणि अशाच अनेक आधुनिक उपकरणांची माहिती काढून त्यांचा उपयोग करण्याची आणि या आमच्या नवीन पिढीशी त्यांच्याच भाषेत संवाद साधण्याची. मग आमची मुलेबाळे अभिमानाने म्हणतील, 'ए, हे आमच्या आजोबांना माहीत आहे हं.'

आशा बाळगा, 'अच्छे दिन जरूर आयेंगे!'

✳

---

## नजर

**-हेमंत विनायकराव तळपदे**

आज अचानक तू दिसलीस
संवेदना स्मृतींच्या जागृत झाल्या
वीस वर्षांनी पुन्हा एकदा
जीव माझा मोहरून गेला

कॉलेजातले ते सुखद दिवस
कोवळे तारुण्य लाभलेले
नजर तुझ्याकडे वळवता वळवता
मानेचे स्नायू मोहरलेले

कधी एकदा बोलतो तुझ्याशी
कधी अनुभवी तुझे स्निग्ध हास्य
परि जमलेच नाही मला जराही
संकोच दाखवी हे संस्कारी हास्य

शिक्षण एकत्र संपविले आपण
मार्ग परि अनोळखी लाभले
संसारातल्या कष्टमयी दिवसांचे
ऋतुचक्र ते अविरत चालले

आता मात्र सावरलो मी
धीर करून बोलणार तुझ्याशी
सुंदर सखी जीवनी लाभावी
मनोकामना पुरी करणार माझी

✳

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

'' नाही अरे - तूच नीट विचार करून बघ. माणसाचं क्लोनिंग हा खेळ नव्हे. चांगल्या माणसाचं होईल तसं वाईट माणसांचंही होईल. नी त्यांचे आईवडील वाईटच असतील तर त्यांना हे 'संकट' वाटणार नाही नी मग पृथ्वीवर अराजक माजेल... नको नको.. त्यापेक्षा क्लोनिंगचा मोह सोडू या. सर्वांना या विचारापासून परावृत्त करू या....''

अमोलही आता विचारात पडला. जगातल्या क्लोन्सच्या पहिल्या दहापैकी एकाचे नी भारतातल्या पहिल्या क्लोनचे आईवडिल म्हणून मिरवण्याची त्यांची संधी नी स्वप्न सगळं धुळीला मिळणार होतं... पण... शर्वरी म्हणत होती त्यात तथ्यही होतं. प्राण्यापुरतं नी खाण्यापुरतं क्लोनिंग ठीक होतं - मुलाचं नको - हा अमोलचा निश्चयही पक्का झाला.

✳

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ
श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ
सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

* कै. मंजुळा नारायण धराधर यांच्या स्मरणार्थ चि. अनिरुद्ध राकेश धैर्यवान यांजकडून रु. ५००/-
* सौ. अश्मिता राहुल प्रधान यांजकडून रु. ५००/-
* श्री. गिरीश शंकर कोठारे यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-
* सौ. ऐश्वर्या आणि श्री. आशीष प्रमोद नवलकर यांजकडून कु. अनुष्का आशीष नवलकर हिच्या यशाप्रीत्यर्थ रु. २००/-

सर्व देणगीदारांचे आभार

## अभिनंदन

आपल्या ज्ञातीतील पाककुशल कै. लक्ष्मीबाई धुरंधर यांचे 'हजार पाकक्रियांचे गृहिणीमित्र' नावाचे पुस्तक आपल्या ज्ञातीतील आणि ज्ञातीबाहेरील अनेकजणांना मित्रक ठरले. अनेकजणांनी त्याची दखल घेऊन त्याची विसावी आवृत्ती निघाली. अतिशय दुर्मिळ असलेल्या या पुस्तकाविषयी मोहसिना मुकादम आणि सुषमा पौडवाल यांनी लोकसत्ताच्या चतुरंगमध्ये विस्तृत माहिती दिली आहे, ही आपल्याला अभिमानाची बाब आहे.

## CONGRATULATIONS

Ms Anushka Ashish Navalkar daughter of Mrs Aishwarya Ashish Navalkar has been felicitated by her college Sheila Raheja Institute of Hotel Management for the following achievements

3rd ranker in semester I over all FY BSC( Hospitality Studies

Gold Medalist Food Production & Patisserie I (Subject Ranker)

Gold Medalist House keeping I (Subject Ranker)

Silver Medalist Information Technology I (Subject Ranker)

2nd Runner up Bakery Competition

1st place Gold Medal. Food & Beverage : Dress me up ( Table Decoration)

Nominated Best student of the year Award.

## परीक्षेतील सुयश

### हॉटेल मॅनेजमेंट

कु. अनुष्का आशीष नवलकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळ साखर दिला

| | |
|---|---|
| २८-३-१७ | करण विक्रम वेलकर, प्रार्थना महेंद्र बांदेकर (आं. ज्ञा.) |
| १९-४-१७ | डॉ. पायल प्रदीप राणे, श्री. आदित्य आचरेकर (आं. ज्ञा.) |

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २४-४-१७ | डॉ. जय केशव धुरंधर | वय ७७, | शिवडी |
| २४-४-१७ | श्री. प्रभाकर वसंत धुरंधर | वय ७२ | खार |
| २४-४-१७ | श्रीमती विजया मोहन कोठारे | वय ८४ | गिरगाव |

## पाठारे प्रभु सोशल समाज

गुढीपाढवा, मंगळवार दि. २८ मार्च २०१७ रोजी खारच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ५ वाजता संस्थेचा १२९ वा वर्धापन दिन साजरा झाला. या शुभप्रसंगी अध्यक्षा होत्या श्रीम. मृदुला प्रभुराम जोशी (पूर्वाश्रमीच्या आगासकर). समारंभाचे सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांचे होते. स्वागत केले समाजाध्यक्षा स्वाती राणे यांनी. अध्यक्षांनी आपले मनोगत यथोचित शब्दांत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, ''मी सोशल समाजाच्या व्यासपीठावरूनच वक्तृत्वाचे पहिले धडे गिरवले, मोतीराम जयकर, श्री. प्रमोद नवलकर, सी. बी. वेलकर, यांनाही सोशल समाजानेच सुरुवातीला व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. पाठारे प्रभु सोशल समाजाची मी ऋणी आहे. आज अध्यक्ष या नात्याने मी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करते.''

वर्धापनदिनाचे औचित्य साधून खालील विशेष पुरस्कार अध्यक्षांच्या हस्ते दिले गेले. श्री. सुनील सुधाकर कोठारे (ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील समाजसेवेसाठी सुवर्ण पदक), श्री. नरेश शंकर मानकर (दीर्घकाली ज्ञाती सेवा सुवर्णपदक), सौ. तेजस्वीनी अजित मानकर (ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील समाजसेवेसाठी सुवर्णपदक), श्री. अमोघ श्रीकृष्ण कीर्तिकर (धार्मिक सेवा सुवर्णपदक), श्री. किरण कमलाक्ष कोठारे (साहित्य सेवा, सुवर्णपदक), श्री. किशोर माधव जयकर (अभिनय पुरस्कार), कु. वैजयंती विश्वास अजिंक्य ('हटके' पुरस्कार), श्री. राजपाल उदयकुमार नवलकर (फोटोग्राफी पुरस्कार), सौ. शुभांगी नीलेश कोठारे (ज्ञातीबाहेरील समाजसेवा) हे मान्यवर पुरस्कारांचे मानकरी होते. या शिवाय कु. देवयानी समीर व्यवहारकर, श्री क्रिश राज मानकर, श्री. अथर्व आशीष कीर्तिकर, कु. ऐश्वर्या सुहास धराधर, कु. पलक उन्मेष नायक, कु. आयेशा अभिजित कोठारे, कु. ॲरिएला अनिक मानकर, श्री. अनुज देवराज अजिंक्य, कु. देवश्री अमोघ वैद्य, श्री. अमरीश रोहित जयकर, कु. सायली शशांक गोरक्षकर, श्री. अखिलेश संदीप राणे, श्री. सचेत संजय देसाई, श्री. धनिश विकास कोठारे, श्री. निश तुषार नवलकर, श्री. निषार मिलींद सेंजित, सौ. प्रिया समीर धुरंधर, कु. आरती किरण व्यवहारकर, कु. देवश्री नीलेश कोठारे, श्री. मयुरेश दिलीप वाझकर, कु. तृप्ती अजित तळपदे, कु. अनिषा भूषण तळपदे, कु. संकिता देवराज अजिंक्य आणि कु. रोशनी यतीन व्यवहारकर या परीक्षेत उज्ज्वल यश प्राप्त करणाऱ्यांचाही शैक्षणिक पुरस्काराने गौरव करण्यात आला.

आभार मानले समाजाच्या उपाध्यक्ष स्वाती जयकर यांनी.

समारंभाचे स्वागतगीत आणि अध्यक्षाभिनंदन गीत कवयित्री नलिनी तळपदे यांच्या समर्थ लेखणीतून उतरले होते. सौ. रॉनिका विजयकरांनी ते सुरेल स्वरात सादर केले.

सोशल समाजाने भविष्यातही अनेक उपक्रमांची गुढी उभारावी.

✳

**Annual Convocation of MSC (Applied Nutrition) Programme 2014-16 batch & valedictory of 54th PG Certificate Course in Nutrition- 17th March, 2017**



Dr. B. K. Nandi gave away the Gold Medal and Scholarship instituted by him to the meritorious students- Ms. Utkarshini Nitin Motilal Kirtikar

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67